13 JUL 2023

महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डांगे महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या गुणात्मक वाढीवर भर

## डॉ.डी.टी.शिर्के

हातकणंगले,ता.१२(प्रतिनिधी)-

अण्णासाहेब डांगे महाविद्यालयाने व्यावसायिक अभ्यासक्रमास प्राधान्य दिले.तसेच विद्यार्थ्यांच्या संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीवर भर दिला. ही बाब कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के यांनी केले.

हातकणंगले येथील अण्णासाहेब डांगे महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्ष सांगता समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.अण्णासाहेब डांगे हे होते.



डांगे महाविद्यालयाच्या समारंभात मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ.डी. टी. शिर्के, शेजारी डॉ.अण्णासाहेब डांगे, भगवानराव साळुंखे आदी.

प्राचार्या डॉ.योजना जुगळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.माजी आम.भगवानराव साळुंखे म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थी तसेच वंचित घटकांसाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात डॉ.अण्णासाहेब डांगे यांचे मोठे योगदान आहे. डॉ. अण्णासाहेब डांगे अध्यक्षीय भाषणात म्हणाले, सामाजिक जाण व भान याची जाणीव करून देणारे शिक्षण देणे गरजेचे आहे. माजी जि.प.सदस्य अरुण इंगवले, प्राचार्य श्रीधर हेरवाडे, सचिव राजेंद्र डांगे,विश्वनाथ डांगे,विठ्ठलराव मुसाई, डॉ.आप्पासाहेब पुजारी, माजी प्राचार्य डी.बी.जुजारे, बापूसाहेब ठोंबरे, नूरमहंमद मुजावर यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. संपतराव पाटील, छगनराव नांगरे, हिराताई मुसाई, डॉ.वसंतराव जुगळे, डी.बी.पिष्टे, गुंडोपंत इरकर, रावसाहेब पुजारी, धोंडीराम कोरवी, शहानवाज मुजावर, शंकरराव शिरसट,संदीप मोरे, पंडित निंबाळकर, मुरलीधर दीक्षित, सिकंदर कोठावळे आदिंसह माजी विद्यार्थी,पालक,शिक्षक उपस्थित होते. प्रा.डॉ. अमर कांबळे यांनी आभार मानले. प्रा.डॉ.सुनीता तेलसिंगे, प्रा.रवींद्र पडवळे यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 JUL 2023
सकाळ

## कमी वेळेतील मूल्यमापनाचे नवे मॉडेल; शिवाजी विद्यापीठाचे दिलासादायक पाऊल

# २० दिवसांत ३७३ निकाल जाहीर

▶ **संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. १३ : निकालाअभावी विद्यार्थ्यांची पुढील प्रवेशाची, नोकरीची अडचण होऊ नये, या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाने या वर्षी कमी वेळेत उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करण्याचे नवे मॉडेल यशस्वीपणे राबविले. त्याचा चांगला परिणाम दिसला असून, २० दिवसांमध्ये परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विविध ३७३ अभ्यासक्रमांच्या उन्हाळी सत्रातील परीक्षांचे निकाल आजअखेर जाहीर केले आहेत.

कोरोनाने शैक्षणिक वर्षाची आणि परीक्षा व्यवस्थेची घडी विस्कळीत केली. ते लक्षात घेऊन विद्यार्थी हिताच्यादृष्टीने विद्यापीठाने उन्हाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमांच्या ६०० परीक्षा २५ मे ते ९ ऑक्टोबर दरम्यान घेतल्या. वेळापत्रकाबरोबर उत्तरपत्रिका मूल्यमापनाचे वेळापत्रक निश्चित केले. कमी वेळेत मूल्यमापन करण्याच्या वेळापत्रकाच्या अंमलबजावणीबाबत प्राचार्य, उत्तरपत्रिका मूल्यमापन केंद्राचे (कॅप) संचालक, शिक्षक, कर्मचारी आदींना परीक्षा सुरू होण्यापूर्वी मार्गदर्शन केले. वेळापत्रकाची नियोजनबद्ध अंमलबजावणी केली. परीक्षा मंडळाने आजअखेर ४६४ परीक्षांचे निकाल जाहीर केले. त्यातील ३७३ निकाल २० दिवसांत जाहीर झाले आहेत. कमी वेळेत निकाल जाहीर करण्याचे विद्यापीठाने पाऊल विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक, तर अन्य शैक्षणिक संस्थांसाठी मार्गदर्शक ठरणारे आहे.

**आता कायम 'नव्या मॉडेल'ची अंमलबजावणी**

कुलपती कार्यालयाच्या निर्देशानुसार कोणतीही परीक्षा झाल्यानंतर ३० ते ४५ दिवसांत निकाल जाहीर करण्याची मुदत आहे. पण, शिवाजी विद्यापीठाने या विहीत मुदतीपेक्षा कमी दिवसांत निकाल जाहीर करण्याचे नवे मॉडेल विकसित केले. त्याआधारे यंदा १ ते २, ११ ते २० इतक्या दिवसांत निकाल जाहीर केले. विद्यापीठात आता यापुढे कायम या मूल्यमापनाच्या नव्या मॉडेलची अंमलबजावणी केली जाणार असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के आणि परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. जाधव यांनी सांगितले.

> यावर्षी परीक्षेचे निकाल नेहमीच्या परंपरेपेक्षा कमी वेळेत लागावेत. प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना अडचण येऊ नये म्हणून परीक्षेबरोबरच उत्तरपत्रिकांच्या मूल्यमापनाचे वेळापत्रक तयार करून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली. त्याचा सकारात्मक परिणाम दिसला. त्यात प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, परीक्षा मंडळातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान राहिले. कमी वेळेत निकाल लावण्याचे शिवाजी विद्यापीठाचे मॉडेल इतर विद्यापीठ, शैक्षणिक संस्थांना निश्चित मार्गदर्शक ठरेल.
> **-डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू

### परीक्षा मंडळाने अशी राबविली प्रक्रिया

कुलगुरूंच्या सूचना आणि मार्गदर्शनाने कमी वेळेतील मूल्यमापनाचे वेळापत्रक निश्चित केले. त्यासाठी परीक्षा आणि मूल्यमापन प्रक्रियेतील शिक्षक, कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १६ 'कॅप' सेंटरवरील मूल्यमापनाच्या कामकाजासाठी विषयाचे नाव, सांकेतिक क्रमांक, रोज किती उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन, मॉडरेशन, क्वॉलिटी चेक केले, गुणांची ऑनलाईन नोंद केली, आदींचा तक्ता तयार करून दिला. विद्यार्थी संख्या, सीईटी होणारे अभ्यासक्रम लक्षात घेऊन मूल्यमापनासाठी दिवसांची मुदत ठरवून दिली. त्यानुसार मूल्यमापनाचा आढावा रोज घेण्यात आला. त्याने कमी दिवसांत जास्तीत जास्त निकाल जाहीर करण्यात यश मिळाल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

### दृष्टिक्षेपात निकाल




### विद्याशाखानिहाय जाहीर झालेले निकाल

